लोकमत



शिवाजी विद्यापीठात आयोजित करण्यात आलेले स्पार्क फोटोग्राफी प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी अशी गर्दी केली होती.

# शिवाजी विद्यापीठात 'स्पार्क'ला उदंड प्रतिसाद!

## नागरिकांनी घेतला प्रदर्शन पाहण्याचा आस्वाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सुरू असलेल्या सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंट्री फोटोग्राफीच्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या छायाचित्रांच्या 'स्पार्क' प्रदर्शनाला रसिकांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला. विद्यार्थी, शिक्षकांसह समाजाच्या वेगवेगळ्या स्तरातील नागरिकांनी फोटो प्रदर्शन पाहण्याचा आस्वाद घेतला.

विद्यापीठासह कोल्हापुरातील नामवंत छायाचित्रकार, कलाकार तसेच विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट दिली. शिवाजी विद्यापीठाचे अनेक कर्मचारी, अधिकारी तसेच विविध विभागांतील शिक्षकांनीही प्रदर्शन पाहिले. विद्यापीठात फोटोग्राफीचा कोर्स सुरू होऊन अवघा दीड महिना झाला आहे. या काळात विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने फिल्डवर जाऊन फोटोग्राफी केली. हे फोटोग्राफी प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी शिक्षक जयसिंग चव्हाण, विराज चव्हाण, राहुल शहा, अभिजित गुर्जर आदींनी परिश्रम घेतले. प्रदर्शनात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण केले जाणार आहे, अशी माहिती कोर्सचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली.

पुण्यनगरी

# मिनी मॅरेथॉन स्पर्धेत ४०० स्पर्धकांचा सहभाग

**कोल्हापूर :** जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्ट प्रोग्राम व राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधत हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागामार्फत मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ४०० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनासमोर ध्वज दाखवून स्पर्धेस प्रारंभ झाला. आपल्या राष्ट्राच्या गौरवासाठी धावा हा संदेश घेऊन मानव्यशास्त्र इमारतमार्गे धावत हे स्पर्धक मुख्य इमारतीच्या समोरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोरून राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृह येथे या स्पर्धेची सांगता झाली.

स्पर्धेचा निकाल असा : मुलांमध्ये पहिला क्रमांक तुकाराम मोरे (अर्थशास्त्र), दुसरा विजय बाजबाळकर (बी.लीप), तिसरा मयूरेश हासोळकर (इतिहास), चौथा विठ्ठल मोटे (इंग्रजी), पाचवा आशुतोष हंकारे (औद्योगिक रसायनशास्त्र), मुलींमध्ये पहिला क्रमांक प्रेरणा घाडगे (तंत्रज्ञान), दुसरा विजया कालोले (तंत्रज्ञान), तिसरा प्रज्ञा पाटील (रसायनशास्त्र), चौथा तृप्ती इंगळे (इंग्रजी), पाचवा अपर्णा फाळके (वनस्पतीशास्त्र). त्याचबरोबर अधिविभागातील शिक्षक, प्रशासकीय सेवक पुढीलप्रमाणे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. गजानन राशिनकर, लक्ष्मण परीट (रसायनशास्त्र), डॉ. एस. एम. पाटील (वनस्पतीशास्त्र), नितीन नाईक (सूक्ष्मजीवशास्त्र), प्रशांत जाधव (विद्यापीठ ग्राहक भांडार), डॉ. निलांबरी जगताप (मराठा इतिहास), अनुप्रिया तरवाळ (रसायनशास्त्र).